महाराष्ट्र शासन उद्योग संचालनालय
जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा तहसिल कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा.
दुरध्वनी क्रमांक 07262-295564 E-Mail didic.buldhana@maharashtra.gov.in

## जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (DEPC) बैठक दिनांक १९/०६/२०२४ चे इतिवृत्त.

जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (DEPC) ची बैठक दिनांक **१९/०६/२०२४** रोजी दुपारी ५.०० वांजता मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील समितीचे सदस्य हजर होते.

| अ.क्र. | उपस्थित सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. किरण पाटील (भाप्रसे) | अध्यक्ष, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती, तथा जिल्हाधिकारी,बुलडाणा. |
| २ | कु.स्नेहल वी ढोके | महानिदेशक विदेश व्यापार,अपर महानिदेशक विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर लिंकद्वारे |
| ३ | श्री.अंकित गुप्ता | CA EY टिम |
| ४ | श्री.प्रमोद लांडे | सचिव, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती, तथा महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलडाणा. |
| ५ | श्री. कोमलेंद्र कुमार सिंह | LDM,बुलडाणा. |
| ६ | श्री.एस.पी.राऊत | क्षेत्र व्यवस्थापक,एमआयडीसी अमरावती |
| ७ | श्री.राजेश इंगळे | प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,बुलढाणा |
| ८ | श्री.संदिप पोटे | संचालक,RSETI |
| ९ | श्री.अमोल शिरसागर | आरबीओ,एसबीआय |
| १० | एस.आर.कणखर | कृषि उपसंचालक |
| ११ | श्री.रोहीत टी.गाढे | जिल्हा विकास प्रबंधक,नाबार्ड |
| १२ | श्री.एस.जी.पाटील | उद्योग अधिकारी,जिउके बुलढाणा. |
| १३ | श्री.एन.एस.पाटील | उद्योग अधिकारी,जिउके बुलढाणा. |
| १४ | श्री.दत्तात्रय कडू | उद्योग निरीक्षक,जिउके बुलढाणा. |

मा.अध्यक्षांच्या परवानगीने महाव्यवस्थापक,जिउके बुलढाणा यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

१. मा.अध्यक्षांनी बैठकीत सांगितले की, बुलढाणा जिल्हा हा अमरावती विभागात निर्यातीमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. जिल्हयाचे सन २३-२४ एकुण निर्यात ही ८४१ कोटी इतकी आहे. जिल्हयात कापुस,ऑरगॅनिग केमिकल्स, साबण हे प्रमुख निर्यात होणारे उत्पादने आहेत. तसेच जिल्हयातुन बाग्लादेश,निदरलॅंड,युके,सिंगापूर,अरब अमरात,युएसए,ब्राझील यासारख्या देशांमध्ये निर्यात होते.

२. मा.अध्यक्षांनी सांगितले की,बुलढाणा जिल्हा कृषिप्रधान असुन कापुस सोयाबीन व मका हे प्रमुख पिक आहे.जिल्यात सोयाबीन चे उत्पादन हे देशाच्या उत्पादनापेक्षा अधिक आहे. जिल्हयात उदयोगाला लागणारा कच्चा माल मोठया प्रमाणात उत्पादीत होतो परंतु कृषि प्रक्रिया व अन्न प्रकिया उदयोग मोठयाप्रमाणात नसल्याने निर्यात होत नाही. कृषि विभागाने शेतकरी गट,फार्मर प्रोडयुसिंग कंपनीची बैठक घेऊन पांढरी मुसळ ला जीआय मांनाकनाची मिळण्याची प्रक्रिया सुरु करावी.

३. मा.अध्यक्षांनी सांगितले की, जिल्हयात निर्यातीकरीता लागणारे लायसंन्स,परवानगी याबाबत उदयोजकांना फारसी माहिती नसल्याने DGFT ने कार्याशाळा आयोजित करावी.त्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुर्ण सहकार्य करण्यात येईल.

४. जिल्हा निर्यात कक्ष हे जिल्हा उद्योग केंद्र येथे स्थापन करण्यात आले आहे. या कक्षांत निर्याताशी संबंधित कागदपत्रे,परवाने तसेच भौगोलिक (GI) मानांकनासाठी संबंधीची माहिती उदयोजकांना देण्यात येईल.

महाराष्ट्र शासन उद्योग संचालनालय
जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा तहसिल कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा.
दुरध्वनी क्रमांक 07262-295564 E-Mail didic.buldhana@maharashtra.gov.in

त्याकरीता जिउके कार्यालयातील कर्मचा-यांना पहिले प्रशिक्षण हे (DGFT) नागपुर,ॲपेडा तसेच निर्याताशी संबंधित यंत्रणांनी दिले आहे असे मा.अध्यक्षांनी सांगितले.तसेच याबाबतचे प्रशिक्षण पुन्हा आयोजित करावे अशा सूचना मा.अध्यक्षांनी (DGFT) नागपुर यांना दिल्या.

५. जिल्हयात महाराष्ट्र औदयोगिक समुह योजनेअंतर्गत ६ औदयोगिक समुह स्थापित झाले आहेत. प्रत्येक तालुक्यात २ क्लस्टर स्थापित करण्याकरीता,माविम,एमएसआरएलएम,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा व कृषि विभागाने संभाव्य औदयोगिक समुहाची निवड करुन विहित नमुन्यातील माहीती जिल्हा उदयोग केंद्र कार्यालयास पुढील कार्यवाहीकरीता दयावी अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

६. एसबीआय बँकेंने जिल्हयात विदेशी चलनातील व्यवहारासाठी MIDC चिखली व बुलढाणा येथे शाखा स्थापित करावी त्यासंबंधी प्रस्ताव त्यांनी बँकेचे मुख्यालयास सादर करावा व त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास दयावा अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

७. यावर एसबीआय बँक अधिकारी यांनी सांगितले की, MIDC बुलढाणा येथे शाखा स्थापित करणेबाबतचा प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात आला आहे.

८. टाऊन ऑफ एक्पोर्ट एक्सलन्स दर्जा बुलढाणा जिल्हयास मिळणेबाबत विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर यांनी कार्यवाही करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

९. जिल्हयातील उत्पादनांना भौगोलिक (GI) मानांकनासाठी प्रक्रिया/मार्गदर्शन मिळणेकरीता कार्यशाळा विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर यांनी आयोजित करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

१०. निर्यात प्रचालन समितीची सभा ही दरमहा घेतल्या जाते त्यासोबत एक बैठक ही निर्यात करणारे उदयोजकांची व दुसरी बैठक ही जिल्हयातील संभाव्य निर्यातदार उदयोजकांची घेण्यात येईल अशे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले.

११. जिल्हयात उदयोजकांना कुशल कामगारांची गरज असल्याने होटेल मॅनेजमेंट व अकाऊंट जिएसटी यासारख्या प्रशिक्षण हे जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण विभाग,जिल्हा कौशल्य व विकास विभागाने नियोजन करावे असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले.तसेच जिल्हयाची सन २०२४-२५ मध्ये १५०० कोटीची निर्यातीचे लक्ष मा.अध्यक्षांनी दिले.

महाव्यवस्थापक यांनी उपस्थितांचे आभार मानुन, अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलडाणा
तथा सचिव, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती,

जिल्हाधिकारी,बुलडाणा
तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती,